## विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० च्या अंतिम वर्षाच्या

# अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या विविध पुन:परीक्षार्थी (Backlog) परीक्षांबाबत सूचना.



- प्रात्यक्षिक परीक्षा - १५ ते २५ सप्टेंबर, २०२०
- लेखी परीक्षा - १ ऑक्टोबर २०२० पासून
- निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया - ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत





## प्रात्यक्षिक परीक्षांबाबत सूचना

- पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षातील / अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांच्या विद्यापीठाव्दारे घेण्यात येत असलेल्या प्रात्यक्षिक परीक्षा या दि. १३ मार्च, २०२० पर्यंत संबंधित विषयांचे नियमित झालेले प्रात्यक्षिके, जर्नल्स, टर्मवर्क, अंतर्गत मौखिक परीक्षा, विद्यार्थ्यांची एकुण उपस्थिती अथवा अभ्यासक्रमात नमूद तत्सम तरतुदी या आधारे घेतल्या जातील.
- प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना online माध्यमातून / दूरध्वनीव्दारे संपर्क करून प्रात्यक्षिकावर आधारित मौखिक परीक्षा घेतल्या जातील.
- ज्या अभ्यासक्रमांतर्गत मौखिक परीक्षा किंवा प्रकल्प अहवालावर (Project) आधारीत मौखिक परीक्षा आहे, त्यांचे मूल्यमापन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न बोलाविता दूरध्वनीव्दारे मुलाखत, स्काईप किंवा इतर ऑनलाईन माध्यमांव्दारे, PPT सादरीकरणाव्दारे होईल. ज्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प अहवाल जमा झालेले नसतील त्यांचे सॉफ्टकॉपीच्या आधारे अभ्यासक्रमातील नमूद आराखड्याप्रमाणे मूल्यमापन करण्यात होईल.
- अंतिम वर्षातील पून:परीक्षार्थी (Backlog) विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे व पदव्युत्तर वर्गाच्या प्रकल्पाचे मूल्यमापन देखील वरील प्रमाणे करण्यात येईल.
- महाविद्यालयांकडून प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर उपलब्ध असेल.

## लेखी परीक्षांबाबत सूचना

- अंतिम वर्ष /अंतिम सत्राच्या नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षा या दि.१३ मार्च, २०२० पर्यंत शिकविण्यात आलेल्या अभ्यासक्रमावर आधारित होतील.
- अभ्यासक्रम विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.
- लेखी परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जाईल.
- लेखी परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ स्वरूपात बहुपर्यायी (MCQs - Multiple Choice Questions) राहणार आहे.
- अंतिम वर्ष / अंतिम सत्रातील प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या backlog (ATKT) विषयांच्या परीक्षा या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित असतील. या परीक्षा देखील वस्तुनिष्ठ स्वरूपातील (MCQs) प्रश्नपत्रिका तयार करून आयोजित करण्यात येतील.
- कोणत्याही कारणास्तव जे विद्यार्थी परीक्षा देऊ शकणार नाहीत त्यांच्यासाठी एक संधी उपलब्ध करून दिली जाईल व त्यासाठी स्वतंत्र परीक्षांचे आयोजन करण्यात येईल.
- पदवीस्तरावरील परीक्षांसाठी ६० गुण व परीक्षा कालावधी ९० मिनिटे.
- पदव्युत्तर स्तरावरील परीक्षांसाठी ६० गुण व परीक्षा कालावधी १२० मिनिटे.
- अभियांत्रिकी व तांत्रिकी, औषधनिर्माण, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र, व्यवस्थपनशास्त्र या अंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष / अंतिम सत्रातील नियमित व backlog सह (ATKT) विद्यार्थ्यांच्या परीक्षा online पध्दतीने होणार आहे. यासाठी लागणाऱ्या Laptop/ Desktop with Web Camera / Smart Phone या साधनांची व्यवस्था विद्यार्थ्यांना स्वत: करावयाची आहे.

**ज्या विद्यार्थ्यांना online परीक्षांच्या सुविधांबाबत अडचणी असतील अशा विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष जाऊन OMR वर आधारित MCQs परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध असेल. याकरीता विद्यार्थ्यांना सोयीचे परीक्षाकेंद्र निवडण्याचा पर्याय उपलब्ध असेल.**

- कला, विज्ञान, वाणिज्य आणि समाजकार्य याअंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष / अंतिम सत्रातील नियमित व backlog सह (ATKT) विद्यार्थ्यांच्या परीक्षा online पध्दतीने होणार आहे. यासाठी लागणाऱ्या Laptop/ Desktop with Web Camera / Smart Phone या साधनांची व्यवस्था विद्यार्थ्यांना स्वत: करावयाची आहे.
- या परीक्षांसाठी सर्व प्रविष्ठ विद्यार्थ्यांना Online अथवा Offline परीक्षा देण्याचा विकल्प (option) अर्ज महाविद्यालयांकडे भरून द्यावा लागेल.
- बी.एफ.ए., एम.एफ.ए., आर्किटेक्चर अशा कौशल्यावर आधारित (skill based) अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा कालावधी जास्त असल्याने ऑनलाईन परीक्षा घेणे शक्य नाही. अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील नियमित व backlog सह (ATKT) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन पारंपारिक पध्दतीने केले जाईल. त्यासाठी महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका पुरविण्यात येतील.
- जे विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीत offline पर्याय निवडतील त्यांच्या offline पध्दतीच्या परीक्षांचे आयोजन हे महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, आरोग्य मंत्रालय यांनी कोविड-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शारीरिक अंतर राखून, विद्यार्थ्यांची सूरक्षा व परीक्षांचे पावित्र्य राखून महाविद्यालयाकडून करण्यात येईल.
- Offline पध्दतीने आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षांबाबत स्थानिक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (मा.जिल्हाधिकारी) व पोलीस प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांना अवगत करून त्यांच्या सहकार्याने या परीक्षा घेण्यात येतील.
- ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षा एकाच वेळेस वेळापत्रकाप्रमाणे सुरु होतील.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे सोयी सवलती दिल्या जातील.
- विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण व अध्ययन विभाग (DEEL) अंतर्गत प्रवेशित अभ्यासक्रमांच्या परीक्षा MCQs प्रश्नपत्रिका तयार करून आयोजित करण्यात येतील व या प्रथम, व्दितीय व अंतिम वर्षातील नियमित व backlog सह (ATKT) विद्यार्थ्यांच्या परीक्षा online पध्दतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या होतील. यासाठी लागणाऱ्या Laptop / Desktop with Web Camera / Smart Phone या साधनांची व्यवस्था विद्यार्थ्यांनी स्वत: करावयाची आहे. पदवी व पदवीव्युत्तर स्तरावरील परीक्षांसाठी १०० गुणांची परीक्षा ही १२० मिनिटांची राहील व प्रत्येक प्रश्नाला दोन गुण असून एकूण ५० प्रश्न असतील.
- वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या / बहुपर्यायी (MCQs) परीक्षांसाठी फोटोकॉपी व पूनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.
- ऑनलाईन परीक्षेत तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला सॉफ्टवेअर मार्फत आपोआप वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडवलेली उत्तरे ही आपोआप Save होऊन खंड पडला तेथून परीक्षा पुन्हा सुरू होईल.
- ऑनलाईन परीक्षा पध्दतीची इतर तांत्रिक माहिती स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.
- ऑनलाईन परीक्षेचा सराव व्हावा या करीता सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test / Practice Test) मुख्य परीक्षेपुर्वी करण्यात येईल.
- परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी covid19helpdesk@nmu.ac.in यावर ई-मेल करावा
- कोविड-१९ या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे वरील सर्व तरतूदी या फक्त शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० साठीच असतील.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
'A' Grade NAAC Re-accredited (3rd Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव



(२५७)२२५७१०० , २२५८४२८ Fax:-(२५७) २२५८४०७, २२५८४०६, www.nmu.ac.in